# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.१२३/२०२०

**विषय : कला, वाणिज्य व विज्ञान (२०१३ पॅटर्न), बी.एस्सी.ॲनिमेशन (२०१६ पॅटर्न), एल.एल.बी. (२०१७ पॅटर्न) या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा व एम.ई. (Elective) या अभ्यासक्रमाच्या सर्व वर्षांच्या परीक्षा या महाविद्यालय/संस्था स्तरावर आयोजित करण्याबाबत.**

कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कला, वाणिज्य व विज्ञान (२०१३ पॅटर्न), बी.एस्सी.ॲनिमेशन (२०१६ पॅटर्न), एल.एल.बी. (२०१७ पॅटर्न) या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा व एम.ई. (Elective) सर्व वर्षाच्या परीक्षा पूर्वीप्रमाणेच महाविद्यालय/संस्था स्तरावर आयोजित करण्याबद्दल निर्णय झाला आहे. सदर परीक्षांचे नियोजन/आयोजन करण्याकरिताची मार्गदर्शक तत्वे/सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१. उपरोक्त उल्लेखित वर्षातील अनुशेषित विषयांच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन दिनांक ८ डिसेंबर, २०२० ते दिनांक २० डिसेंबर, २०२० दरम्यान महाविद्यालय/संस्था स्तरावर करण्यात यावे. संबंधित परीक्षांच्या निकालाची प्रक्रिया दिनांक १० जानेवारी, २०२१ पर्यंत पूर्ण करुन निकाल सॉफ्ट व हार्ड कॉपीसह परीक्षा विभागास सादर करण्यात यावा.

२. सदर परीक्षा ऑनलाईन/ऑफलाईन (जसे शक्य होईल तसे) एक तासाची बहुपर्यायी प्रश्नाव्दारे घेण्यात यावी. या परीक्षा Online/offline बहुपर्यायी प्रश्नाव्दारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात याव्यात. Online व Offline या दोन्ही पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एक तास) कालावधीच्या राहतील. यासाठी दिलेल्या ६० बहुपर्यायी प्रश्नांपैकी (MCQ)५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात यावीत. या परीक्षेमध्ये ४० टक्के सोपे, ४० टक्के मध्यम व २० टक्के कठीण या काठिण्यपातळीचे प्रश्नांची रचना असावी.

३. सदर परीक्षांचे वेळापत्रक दिनांक ८ डिसेंबर, २०२० ते दिनांक २० डिसेंबर, २०२० पर्यंत असावे व याकरिताच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालय/संस्था स्तरावर पात्र प्राध्यापकांकडून तयार करण्यात यावेत.

४. सदर परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालय/संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे व विद्यापीठाकडून पुरविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीनुसार सर्व संबंधित विद्यार्थ्यांना अवगत करावे. तसेच सदरचे वेळापत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालयाकडे दिनांक ७ डिसेंबर, २०२० पूर्वी कळविण्यात यावे.

५. जे विद्यार्थी ऑफलाईन परीक्षेचा पर्याय निवडतील त्यांच्याकरिता परीक्षांचे आयोजन करण्याबाबत महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग व आरोग्य मंत्रालय, नवी दिल्ली यांनी कोविड-१९ बाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सुरक्षित अंतर ठेवून विद्यार्थ्यांचे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सुरक्षा व परीक्षांचे पावित्र्य राखून महाविद्यालय/संस्था स्तरावर करण्यात यावे.

६. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणा-या विद्यार्थीकरिता विद्यार्थ्यांना परीक्षेबाबतची माहिती होण्यासाठी नमूना प्रश्नांवर आधारीत सराव परीक्षांचे (Mock Test/Practice Test) आयोजन मुख्य परीक्षेपूर्वी करण्यात यावे.

७. उपरोक्त निर्देशित प्रथम वर्षाच्या परीक्षा या ६० बहुपर्यायी प्रश्नांवर एकूण ५० गुणांची घेऊन त्याचे रुपांतर प्रथम वर्षाकरिता मान्य परीक्षा आराखडयाप्रमाणे रुपांतर करुन त्याचा निकाल तयार करण्यात यावा.

८. दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील. सदर विद्यार्थ्यांना महाविद्यालये/संस्थाचे प्राचार्य/संचालक यांच्या पूर्वपरवानगीने लेखनिक/ सहायक घेता येईल.

९. Online व Offline या दोन्ही पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

१०. सदर परीक्षांच्या आयोजनापूर्वी अथवा परीक्षेदरम्यान येणा-या अडचणी व शंकांचे निराकरण करण्यासाठी महाविद्यालय/संस्थेमध्ये विद्यार्थी सहायता कक्ष तयार करण्यात यावा.

११. संबंधित परीक्षांच्या प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षांचे आयोजन करणे इत्यादी कामांचे मानधन महाविद्यालय/संस्थेकडे जमा झालेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कातून देण्यात यावे. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विद्यापीठाकडे करण्यात येऊ नये.

मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना विनंती करण्यात येते की, वरील मागदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन तयार करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे.

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/४२५
दिनांक :२७ नोव्हेंबर, २०२०

प्रति,
१. मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा